# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.06.2025** **वार- शनिवार**

---

**मावळ**

विकास कामं करताना नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची खबरदारी घ्यावी असा इशारा मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील विविध शासकीय कामांच्या आढावा बैठकीत दिला. कर्जत-खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यावेळी उपस्थित होते. बैठकीत विविध खात्यांनी आपल्या अडचणी मांडल्या. भूअभिलेख विभागानं मोजणीसाठी मनुष्यबळ अपुरं असल्याचं नमूद केलं. अंगणवाडी विभागाच्या भारती साताळकर यांनी 'लेक लाडकी' योजनेत मुलींना पहिला हप्ता वितरित झाल्याची माहिती दिली. मात्र, ४५ अंगणवाड्यांना अद्याप स्वतःची जागा उपलब्ध नसल्याकडे लक्ष वेधलं.

**पाप्रस्थान**

आषाढी वारीतील संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी प्रस्थान सोहळा यंदाच्या वर्षी रात्री आठ वाजता होणार आहे. यंदा गुरुवार आल्यामुळं परंपरेप्रमाणं नित्य गुरुवारची माउलींच्या पालखीची मंदिर प्रदक्षिणा आणि आरती झाल्यानंतर पालखीचं प्रस्थान होणार आहे अशी माहिती पालखी सोहळा प्रमुख डॉक्टर भावार्थ देखणे यांनी दिली.

**पालखी**

पालखीमार्गावरील हॉटेलची तपासणी केली जाणार असून कामगारांचीही आरोग्य तपासणी केली जाणार आहे अशी माहिती पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागानं दिली आहे. जेजुरी आणि यवत इथं पालखी मुक्कामाच्या ठिकाणी अतिदक्षता विभाग आणि आवश्यक औषध सामग्रीचा साठा असेल अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सचिन देसाई  यांनी दिली.

**परसबागा**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील ६८ हजार ७०४ शाळांमध्ये परसबागा विकसित झालेल्या आहेत. राज्यातील सर्व शाळांमध्ये परसबागा निर्माण करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं असून, प्रोत्साहनासाठी यावर्षीही उत्कृष्ट परसबाग स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे असं शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव प्रमोद पाटील यांनी  सांगितलं.

**निवडणूक**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या  निवडणुका चार महिन्यांमध्ये घेण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयानं दिल्यानंतर पुणे महापालिका प्रशासनानं निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी याबाबत आज आढावा बैठक घेतली.

**फीडर**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड आणि पुणे मेट्रोद्वारे संयुक्तपणे हडपसर ते कल्याणी नगर मेट्रो स्टेशन मार्गावरील फिडर बस सेवेचा आरंभ आज करण्यात आला.  हडपसर गाडीतळ, मेगासिटी, आयटी टॉवर क्रमांक 1, 3, 5, 9 मुंडवा गाव ते कल्याणी नगर मेट्रो स्टेशन असा हा मार्ग असणार आहे.

**ईद**

ईद ऊल अजहानिमित्त पुणे सोलापूर रस्त्यावरील ईदगाह मैदानावर आज सामूहिक नमाज अदा करण्यात आली. हजारोंच्या संख्येनं मुस्लिमधर्मिय नागरिक ईदगाह मैदानावर जमा झाले होते.  पुणे शहरातील दीडशेहून अधिक मशीदींमध्येही ईदनिमित्त सामूहिक नमाज अदा करण्यात आली.

**<u>साशौ</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सामाजिक विकास विभाग आणि आरोग्य विभागाद्वारे संयुक्तपणे 'नवी दिशा' सामुदायिक शौचालय उपक्रमाचं कार्यपद्धती मूल्यांकन लवकरच सुरू करण्यात येणार आहे. सध्या शहरातील ६० हून अधिक सामुदायिक शौचालये 'नवी दिशा' उपक्रमांतर्गत महिला बचत गटाच्या माध्यमातून कार्यरत आहेत. या प्रक्रियेद्वारे महिला बचतगटांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करून त्यांची क्षेत्रंही निश्चित केली जातील.

**<u>सतर्क</u>**

राज्यात कोरोनासह इन्फ्लूएंझा म्हणजे  एच१एन१, एच३एन२  आणि श्वसनविकारजन्य आजारांची रुग्णसंख्या वाढू लागल्यानं आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. कोरोनाच्या ओमिक्रॉन उपप्रकारातील ‘जेएन.१’ यासह ‘एक्सएफजी’ आणि ‘एलएफ ७.९’ हे कोरोनाचे उपप्रकार अधिक संसर्गजन्य असल्याचं निदर्शनास आलं आहे. यामुळं ताप, खोकला, घसा खवखवणं यासारखे सौम्य आजार होत असून ते स्वतःहून कमी होतात, अशी माहिती आरोग्य विभागाद्वारे देण्यात आली आहे.

**<u>पाणी</u>**

पाण्याची चव आणि वास बदललेला जाणवत असला तरी ते पाणी पूर्णतः पिण्यायोग्य आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागानं दिली आहे. तसंच पावसाळ्यात पाणी उकळून प्यावं, असं आवाहनही करण्यात आलं आहे. पिंपरी-चिंचवड शहराला मावळमधील पवना आणि आंद्रा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. मात्र पावसाळ्यातील चार महिने धरणातील साठा न वापरता

नदीतील पाण्याचा वापर होतो. या कालावधीत नदीच्या पाण्यात गाळ, झाडपाला, सांडपाण्यासारखा कचरा वाहून येतो. यामुळं पाणी गढूळ होतं तसंच विरघळलेल्या घन पदार्थांचं प्रमाण वाढतं. याचा परिणाम पाण्याच्या चव आणि वासावर काही प्रमाणात होतो.

**<u>कोडींग</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या महिनाभराच्या कोडिंग उन्हाळी शिबिराचा समारोप उत्साहात झाला. या मोफत उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ८० शालेय विद्यार्थ्यांना कोडिंग, तर्कशक्ती आणि सर्जनशीलतेच्या जोरावर समस्येचं निराकरण याबाबत सक्षम करण्यात आलं.

**<u>त्रास</u>**

पुणे महापालिकेतील महिला अधिकाऱ्याला त्रास दिल्याप्रकरणी एका राजकीय पक्षाच्या दोन कार्यकर्त्यांना महापालिकेचं मुख्यालय आणि महापालिकेच्या अन्य कार्यालयांमध्ये प्रवेशबंदी करण्याचा आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिला. हे दोन कार्यकर्ते त्रास देत असल्याची तक्रार संबंधित महिला अधिकाऱ्यानं राज्य महिला आयोगाकडं दिली आहे.

पुणे आणि परिसरात आज सकाळी पावसाच्या जोरदार सरी पडल्या. उद्या मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**